# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

## Notice for Walk in Interview

इचलकरंजी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील घनकचरा व्यवस्थापन नियमाची अंमलबजावणी योग्य रितीने करणेसाठी त्याचप्रमाणे दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत प्रविष्ट झालेल्या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन (NPS) योजनेत समाविष्ट करून त्या योजनेचा लाभ देणेबाबतच्या प्रस्तावाचे संपूर्ण कामकाज पाहणेसाठी या विषयातील अनुभवी अधिकारी/ कर्मचारी यांचे पॅनल तयार करणेत येणार आहे. याकरीता महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ८ जानेवारी, २०१६ मधील तरतुदीनुसार खालील नमुद अर्हता धारण करणाऱ्या तसेच शासकीय / निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामकाजाचा तपशिल | संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| १ | घनकचरा व्यवस्थापन नियमाची अंमलबजावणी करणे | १ | १)सॅनिटरी इन्स्पेक्टर कोर्स उत्तीर्ण<br>२) नगरपरिषद / महानगरपालिका मध्ये सॅनिटरी इन्स्पेक्टर अथवा तत्सम कामकाजाचा किमान १२ वर्षाचा अनुभव |
| २ | राष्ट्रीय निवृत्ती वेतन (NPS) योजनेचे संपुर्ण कामकाज | १ | १)बी. कॉम.,<br>२)नगरपरिषद / महानगरपालिका मध्ये लेखापाल/ लेखापरीक्षक म्हणून कामकाजाचा किमान १२ वर्षाचा अनुभव **किंवा**<br>वित्त विभागाकडील लेखाधिकारी (वर्ग-२) दर्जाचा अधिकारी<br>३)संगणक हाताळणीचे किमान ज्ञान आवश्यक |

याबाबत खालील अटी शर्ती बंधनकारक राहतील.

१) या संदर्भात महानगरपालिकेकरीता तयार करण्यात यावयाच्या पॅनलवर निवड झाल्यानंतर संबंधितांनी इकडील विहीत नमुन्यात करारपत्र करून देणे बंधनकारक राहील.

२) करार पध्दतीने नेमणूक करताना त्याना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकुण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना सध्या मिळत असलेले एकुण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता व अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल मात्र असे पारिश्रमिक कमाल रक्कम रु. ४०,०००/- इतक्या मर्यादेत असेल.

३) दिनांक ८ जानेवारी, २०१६ मधील सर्व अटी शर्ती पॅनलवर निवड झालेल्या संबंधितांवर लागू राहतील.

तरी वरील अटी शर्ती मान्य असणाऱ्या व अर्हताधारक इच्छुकांनी त्यांचे अर्ज व अर्हता / अनुभव विषयक कागदपत्रांसह (मूळ व छायांकित प्रती) दिनांक ९/१२/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

(डॉ. प्रदीप ठेंगल)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका